महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# <u>सुधारपत्र क्र. ३३ दिनांक २५ / ०५ / २०१६</u>

**(म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम - २००५)**

विषय : म.रा.वि.वि.कंपनी मर्या.मधील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुती रजेसंदर्भात सेवा कालावधीची अट वगळण्याबाबत.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन) यांचेशी विचारविनिमय करुन कर्मचारी सेवाविनियम २००५ सेवाविनियम क्र.५३ मध्ये खालील प्रमाणे सुधारित करण्याकरिता मंजुरी प्रदान केलेली आहे.

## <u>सेवाविनियम क्र.५३ (क) (एक)</u>

कंपनीमध्ये स्थायी किंवा अस्थायी पदांवर कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती रजेची सवलत मिळेल. तथापि, ज्या महिला कर्मचाऱ्यांची कंपनीतील सेवा ही दोन वर्षापेक्षा कमी असेल अशा महिला कर्मचारी प्रसुती रजा घेऊ शकतात.

मात्र प्रसुती रजा मंजुर करण्यापुर्वी ६ महिन्यांच्या वेतनाइतक्या रकमेचे बंधपत्र (Bond) अशा महिला कर्मचाऱ्यांनी सादर करणे आवश्यक राहील व तद्नंतरच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रसुती रजा व रजा वेतन मिळण्यास त्या पात्र ठरतील.

तसेच अशा महिला कर्मचाऱ्याने प्रसुती रजा संपवून कंपनीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर किमान दोन वर्षे किंवा सेवाविनियम क्र.११ मध्ये विहित करण्यात आलेल्या बंधपत्राच्या कालावधीतील सेवा यापैकी जो कालावधी जास्त असेल अशा कालावधीकरिता कंपनीची सेवा करणे बंधनकारक राहील. अशा बंधनकारक सेवेचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, प्रसुती रजा कालावधीत/प्रसुती रजेनंतर रूजू न होता/प्रसुती रजा संपवून रुजू झाल्यावर इतर सेवेत जाण्याकरिता प्रकरणपरत्वे कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास/राजीनामा द्यावयाचा झाल्यास अथवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा झाल्यास अशा महिला कर्मचाऱ्याने घेतलेल्या प्रसुती रजा कालावधीत देय झालेल्या वेतनाइतके वेतन सेवाविनियम क्र.११ मध्ये विहित केलेल्या बंधपत्राच्या रक्कमेव्यतिरीक्त कंपनीस अदा केल्यानंतरच अशा महिला कर्मचाऱ्यास कंपनीच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा सक्षम अधिकारी यांच्या मंजुरीने कार्यमुक्त होता येईल.

२. या अनुषंगाने विहीत भरती प्रक्रियेनंतर कंत्राटी पद्धतीवर नियुक्त झालेल्या महिला कर्मचाऱ्यांकरिता प्रसुती रजेकरिता विहित करण्यात आलेली किमान सेवेची अट रद्द करण्यात येत असून अशा सर्व महिला कर्मचाऱ्यांना कंपनीमध्ये स्थायी अथवा अस्थायी पदावर कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुती रजेच्या कालावधी इतका म्हणजेच जास्तीत जास्त १८० दिवसांपर्यंत प्रसुती रजा मंजूर करण्यात यावी व प्रसुती रजेच्या कालावधीमध्ये अशा कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना त्या ज्या पदावर नियुक्त झालेल्या आहेत अशा पदाकरिता विहित करण्यात आलेल्या व वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या दराने मानधन मिळण्यास पात्र ठरतील. तथापि, सदर महिला कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर कंपनीमध्ये नियुक्त झालेल्या असल्याने त्यांचा कंत्राटी कालावधी हा प्रसुती रजेच्या कालावधी इतका वाढविण्यात यावा. तसेच राजीनामा/नोकरी सोडण्याबाबत कंपनीतील इतर महिला कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अटी व शर्ती अबाधित राहतील.

३. सदर सुधारपत्र जारी केल्याच्या तारखेपासून लागू राहील.

४. सदर सुधारपत्र कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२१/५/२०१५

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\C.S.- F.N.2-B - Maternity Leave.doc*
*25/05/2016*